मराठी विभाग : वाचन प्रेरणा दिनानिमित्त उपक्रम अहवाल

Title of Programme: वाचन प्रेरणा दिनानिमित्त काव्यवाचन स्पर्धा

Name of Organizing Department: मराठी विभाग

Name of the Coordinator of the Programme: डॉ. संजय शिंदे

Date of the Programme : १४ ऑक्टोबर २०२१

Venue: हुतात्मा राजगुरू महाविद्यालय राजगुरुनगर

Target Group: महाविद्यालयीन विद्यार्थी

Number of Participants: ४0

Name of Resource Person: प्रा.डी.एम.मारकड व प्रा. सोमनाथ ठोंगिरे

Total Expenditure for the Programme: --- ८४० /-

Source of Funding: ----- हुतात्मा राजगुरू महाविद्यालय राजगुरुनगर

**Report: राष्ट्रीय वाचन दिन कार्यक्रम अहवाल**

दि. १४ ऑक्टोबर २०२१ रोजी हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करताना ऑनलाईन काव्यवाचन स्पर्धा आयोजित करण्यात आली. या उपक्रमात सुमारे ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

काव्यवाचन स्पर्धेत प्रथम क्रमांक कु. मयुरी साकोरे, द्वितीय क्रमांक कु. संस्कृती राळे व तृतीय क्रमांक कु. आलिशा रौंधळ यांचा आला. खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी यांच्या हस्ते या स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांना पुस्तक, प्रशस्तिपत्रक, गुलाबपुष्प देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले.

या स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा.डी.एम.मारकड व प्रा. सोमनाथ ठोंगिरे यांनी काम पाहिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय शिंदे यांनी, सूत्रसंचालन डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी तर आभार प्रा. साईनाथ पाचारणे यांनी मानले.

डॉ. संजय शिंदे
मराठी विभाग प्रमुख
मराठी विभाग प्रमुख
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर,ता.खेड,जि.पुणे.

HUTATMA RAJGURU MAHAVIDYALAYA RAJGURU NAGAR

डॉ. व्ही. डी. कुलकर्णी
प्राचार्य
Officiating Principal
Hutatma Rajguru Mahavidyalaya
(Arts, Science & Commerce)
Rajgurunagar,Tal.Khed,Dist.Pune.

वाचन प्रेरणा दिनानिमित्त उपक्रम अहवाल २०२१-२२




काव्यवाचन स्पर्धेतील प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थिनी कु. मयुरी साकोरे हिचा गौरव करताना संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील



काव्यवाचन स्पर्धेतील द्वितीय क्रमांक प्राप्त विद्यार्थिनी कु. संस्कृती राळे हिचा गौरव करताना प्रा. मच्छिंद्र मुळूक



काव्यवाचन स्पर्धेतील प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थिनी कु. मयुरी साकोरे हिचा गौरव करताना संस्थाउपाध्यक्ष मा. नानासाहेब टाकळकर




K.T.S.P. MANDAL'S
HUTATMA RAJGURU MAHAVIDYALAYA
Rajgurunagar, Tal. Khed, Dist. Pune 410505
Accredited B Grade by NAAC
Certificate of Merit
Year 2021 - 2022
Awarded to Mr./Miss. कु. संस्कृती संतोष शळे
being the representative in काव्यवाचन स्पर्धा (वाचन प्रेरणा दिन)
Organised by मराठी विभाग & Secured द्वितीय Place
Date १५/१०/२०२१
Professor Incharge
डॉ. संजय शिंदे
Principal
डॉ. व्ही. डी. कुलकर्णी


K.T.S.P. MANDAL'S
HUTATMA RAJGURU MAHAVIDYALAYA
Rajgurunagar, Tal. Khed, Dist. Pune 410505
Accredited B Grade by NAAC
Certificate of Merit
Year 2021 - 2022
Awarded to Mr./Miss. कु. अलिशा मारुती रेंधळ
being the representative in काव्यवाचन स्पर्धा (वाचन प्रेरणा दिन)
Organised by मराठी विभाग & Secured तृतीय Place
Date १५/१०/२०२१
Professor Incharge
डॉ. संजय शिंदे
Principal
डॉ. व्ही. डी. कुलकर्णी

लोकमत

अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील : हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा

# वाचनातून येणारी सर्वांगिण समृद्धता जगायला शिकवते

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर** : वाचनातून आनंद व त्यातून येणारी सर्वांगीण समृद्धता माणसाला जगण्यास पात्र बनवते. विद्यार्थ्यांनी समृद्ध जीवनासाठी वाचन संस्कृती जोपासावी असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे-पाटील यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांचा जन्मदिवसानिमित्त वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करताना आयोजित पुस्तक भेट कार्यक्रमात अ‍ॅड. बुट्टे पाटील बोलत होते. याप्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. एच.एम.जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळूक, प्रा. किशोर लांडेपाटील, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. डी. एम. मारकड, प्रा. योगेश वाळुंज, प्रा. साईनाथ पाचारणे उपस्थित होते.

अ‍ॅड. बुट्टे पाटील म्हणाले, विद्यार्थी कोणत्याही शाखेचा असला तरी त्याला चौफेर वाचन आवश्यक आहे. वाचनातून ज्ञान तृष्णा व ज्ञान संग्रह करण्याची वृत्ती विद्यार्थ्यांनी जोपासावी. मराठी विभाग विद्यार्थ्यांची वाचनाची आवड जोपासण्यासाठी करीत असलेल्या प्रयत्नांबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालय सुरू होणार असल्याने वरिष्ठ विभागातील विद्यार्थ्यांनी लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन त्यांनी केले.



मयुरी साकोरे हिचा गौरव करताना अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील

## काव्यवाचन स्पर्धेत मयूरी साकोरे प्रथम

१ वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने मराठी विभागाच्या वतीने व्याख्यान, काव्यवाचन स्पर्धा तसेच विविध ऑनलाईन उपक्रमात सहभाग घेतलेल्या सुमारे १२५ विद्यार्थ्यांना ग्रंथ भेट देण्यात आले. कोपरगाव महाविद्यालयातील डॉ. कैलास महाले यांचे ' महाविद्यालयीन तरुणाई व वाचन संस्कृती ' या विषयावर ऑनलाईन वेबिनार संपन्न झाले.

२ काव्यवाचन स्पर्धेत प्रथम क्रमांक मयुरी साकोरे, द्वितीय संस्कृती राळे व तृतीय क्रमांक आलिशा रौंधळ यांचा आला. पुस्तक, प्रशस्तीपत्रक देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले. परीक्षक म्हणून प्रा. डी. एम. मारकड व प्रा. सोमनाथ ठोंगीरे यांनी काम पाहिले.

Hello Pune Gramin
Page No. 8 Oct 17, 2021
Powered by: erelego.com

पुढारी

# समृद्ध जीवनासाठी वाचनसंस्कृती जोपासावी

## अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे-पाटील यांचे आवाहन; राजगुरु महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन



काव्यवाचन स्पर्धेतील प्रथम क्रमांक मिळविलेल्या मयूरी साकोरे हिचा गौरव करताना संस्थाध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे-पाटील.

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

वाचनातून आनंद व त्यातून येणारी सर्वांगीण समृद्धता माणसाला जगण्यास पात्र बनवो. विद्यार्थ्यांनी समृद्ध जीवनासाठी वाचनसंस्कृती जोपासावी, असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे-पाटील यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवसानिमित्त वाचन प्रेरणा दिन गुरुवारी (दि. १४) साजरा करण्यात आला. यानिमित्त आयोजित पुस्तक भेट कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे आदी उपस्थित होते.

वाचन प्रेरणा दिनाच्यानिमित्ताने मराठी विभागाच्या वतीने व्याख्यान, काव्यवाचन स्पर्धा, तसेच विविध ऑनलाइन उपक्रमात सहभागी झालेल्या १२५ विद्यार्थ्यांना ग्रंथ भेट देण्यात आले. कोपरगाव महाविद्यालयातील डॉ. कैलास महाले यांचे ''महाविद्यालयीन तरुणाई व वाचनसंस्कृती'' या विषयावर ऑनलाइन वेबिनार झाले. काव्यवाचन स्पर्धेत मयूरी साकोरे, संस्कृती राळे, आलिशा रौंधळ यांनी अनुक्रमे पहिले तीन क्रमांक मिळविले. परीक्षक म्हणून प्रा. डी. एम. मारकड व प्रा. सोमनाथ ठोंगिरे यांनी काम पाहिले. संजय शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. साईनाथ पाचारणे यांनी आभार मानले.

My Gramin Edition
Oct 17, 2021 Page No. 8
newspaper.pudhari.co.in

# पुणे जिल्हा

**» अवतीभवती**



राजगुरुनगर (ता. खेड) : काव्यवाचन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविलेल्या मयूरी साकोरे हिचा गौरव करताना संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील.

## मयूरी साकोरे काव्यवाचन स्पर्धेत प्रथम

**राजगुरुनगर :** हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने वाचन प्रेरणा दिनानिमित्त व्याख्यान, काव्यवाचन स्पर्धा व विविध ऑनलाइन उपक्रम राबविण्यात आले. यावेळी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी मार्गदर्शन केले. कोपरगाव महाविद्यालयातील डॉ. कैलास महाले यांनी 'महाविद्यालयीन तरुणाई व वाचनसंस्कृती' या विषयावर व्याख्यान केले. काव्य वाचन स्पर्धेत प्रथम क्रमांक मयूरी साकोरे, द्वितीय क्रमांक संस्कृती राळे व तृतीय क्रमांक अलिशा रौंधळ यांचा गौरव करण्यात आला. परीक्षक म्हणून प्रा. डी. एम. मारकड व प्रा. सोमनाथ ठोंगिरे यांनी काम पाहिले. ऑनलाइन उपक्रमात सहभाग घेतलेल्या सुमारे १२५ विद्यार्थ्यांना पुस्तके भेट देण्यात आली. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे,उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळूक, प्रा. किशोर लांडे पाटील, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. डी. एम. मारकड, प्रा. योगेश वाळुंज आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी केले, तर आभार प्रा. साईनाथ पाचारणे यांनी मानले.

डॉ. संजय शिंदे<br>मराठी विभाग प्रमुख

प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी